जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 01-02-2020

तरुण भारत

# 'खांडेकरांचे साहित्य भारतीय संस्कृतीचे संचित'

**कोल्हापूर :** खांडेकरांच्या साहित्यातून वैश्विक भान व्यक्त होते. प्रबोधनकाळाचा आशय आणि गांधीजींच्या विचारांचा खरा अन्वयार्थ खांडेकरांच्या वाङ्मयातून दिसून येतो. कृतिशील काळाशी सहकंपता साधणारे, साहित्य व कला हे वैश्विक मूल्यांची जाणीव असणारे साहित्य खांडेकरांनी भारतीय साहित्य विश्वाला दिले. खांडेकरांचे साहित्य भारतीय संस्कृतीचे संचित आहे, असे प्रतिपादन डॉ. एकनाथ पगार यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागाच्या आणि अनंत व लता लाभसेटवार प्रतिष्ठान अमेरिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वि स खांडेकर जयंती व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या.

अनंत लाभसेटवार म्हणाले, वि. स. खांडेकर यांच्या प्रेरणेतून मी लेखनाची प्रेरणा मिळाली. म्हणूनच मी खांडेकर व्याख्यानमाला सुरू केली. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. भारती पाटील म्हणाल्या, खांडेकर यांच्या साहित्यावरील गांधी विचारांचा प्रभाव त्यांच्या काळातील औचित्यपूर्णता स्पष्ट केली. १९२० नंतरच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनाचे खांडेकर हे साक्षीदार आहेत. त्यामुळे वाङ्मय समजून महत्वाचे आहे.

प्रास्ताविक मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. रमेश वरखडे, प्रा. अविनाश सप्रे, प्रा. संदीप दळवी, डॉ. अरुण शिंदे, डॉ. गोमटेश्वर पाटील, किरण गुरव आदी उपस्थित होते.

# दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी

## ६ फेब्रुवारी रोजी सोहळा : राज्यपाल कोश्यारी, यूजीसीचे उपाध्यक्ष डॉ. पटवर्धन यांची उपस्थिती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ दि. ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या समारंभाचे अध्यक्ष कुलपती तथा राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, तर प्रमुख पाहुणे यूजीसीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन उपस्थित असणार आहेत. या दीक्षांत सोहळ्याची जय्यत तयारी प्रशासनाकडून केली जात आहे.

शिवाजी विद्यापीठातर्फे प्रतिवर्षी मोठ्या उत्साहात दीक्षांत समारंभाचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभाचीही जय्यत तयारी शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे सुरू आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या



मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या परिसर सुशोभीकरणासह अन्य ठिकाणचे सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. विशेष म्हणजे, यंदाच्या दीक्षांत समारंभास राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे उपस्थित राहणार असल्याने यंदाच्या दीक्षांत समारंभाविषयी मोठी उत्सुकता आणि उत्साह निर्माण झाला आहे. त्याचबरोबर विद्यापीठ अनुदान आयोग दिल्लीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती ही उत्साहवर्धक अशीच आहे. सध्या विद्यापीठ परिसरात मंडप उभारण्यात येत आहे.

यापूर्वी पदवी प्रमाणपत्राच्या छपाईमध्ये झालेल्या चुका आणि त्यानंतर निर्माण झालेला वाद लक्षात घेता यंदाच्या दीक्षांतमध्ये असा कोणताही प्रकार घडू नये यासाठी प्रशासन खबरदारी घेत आहे. त्याचबरोबर गतवर्षीपासून ज्या त्या महाविद्यालयात संबंधित विद्यार्थ्यांचा दीक्षांत होत असल्याने यंदाही विद्यार्थ्यांची संख्या कमी असणार आहे.

### कामाला वेग

शिवाजी विद्यापीठ पाच वर्षांनंतर पुन्हा एकदा नॅकला सामोरे जाण्यासाठी सज्ज होत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रशासनाकडून तयारी सुरू आहे. दरम्यानच्या काळात विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ असल्याने विद्यापीठ परिसरात पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्याबरोबरच, परिसराचे सुशोभीकरण करण्याच्या कामाला वेग आला आहे.

अमित गद्रे



## पूल....निसर्ग आणि माणूस जोडणारा

आठशे एकरांत विस्तारलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या नैसर्गिक सौंदर्याचा कळसबिंदू ठरतोय हा देखणा पूल. विद्यापीठातील मुख्य जलस्त्रोत असलेल्या तलावावरील तरंग पाहण्याचा अनुभव देणारा हा पूल. हलकासा वळणदार आणि वाहनांपासून अलिप्त...अस्ताला जाणाऱ्या सूर्याने उधळलेल्या सोनेरी किरणांची शाल पांघरल्यानंतर चमकणारा हा पूल... उन्हं उतरल्यानंतर असो किंवा रिमझिम पावसातली संध्याकाळ असो...या पुलाने विद्यापीठाच्या हिरव्यागार आसमंताला ओलावा देणाऱ्या तलावाची शान चांगलीच वाढवली आहे.

# नॅक मूल्यांकनासाठी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात 'एसएसआर'

## शिवाजी विद्यापीठाची तयारी; 'आयआयक्यूए' मान्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेच्या वतीने (नॅक) करण्यात येणाऱ्या मूल्यांकनासाठी शिवाजी विद्यापीठाकडून वेगाने तयारी सुरू आहे. मूल्यांकन समितीला विद्यापीठाकडून सेल्फ स्टडी रिपोर्ट (एसएसआर) फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पाठविण्यात येणार आहे. त्याबाबतचा आढावा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शुक्रवारी घेतला.

मूल्यांकनाच्या बदललेल्या स्वरुपानुसार विद्यापीठाकडून तयारी करण्यात येत आहे. विविध अधिविभाग आणि प्रशासकीय विभाग, विद्यार्थी, महाविद्यालय, अभ्यासक्रम, संशोधनविषयक माहिती विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने संकलित करून त्याचा इन्स्टिट्यूशन इन्फॉर्मेशन फॉर क्वॉलिटी अॅश्युरन्स (आयआयक्यूए) अहवाल तयार केला. हा अहवाल डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात 'नॅक'च्या पोर्टलवर जमा करण्यात आला. हा अहवाल समितीकडून मान्य झाला आहे. त्यापुढील दुसरा टप्पा असणारा 'एसएसआर' आता फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात पाठविला जाईल. या अहवालानुसार विद्यार्थी समाधान सर्वेक्षण, सादर केलेल्या माहितीची पडताळणी करून काही सूचना 'नॅक'कडून करण्यात येतील. त्याची पूर्तता केल्यानंतर नॅक समिती मूल्यांकनासाठी विद्यापीठ येणार आहे. प्रशासनातील अधिकारी, उपकुलसचिव यांच्याशी त्यांनी चर्चा करून काही सूचना केल्या. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, आदी उपस्थित होते.

### अंतिम टप्प्यात काम

मूल्यांकनाच्या नव्या स्वरुपात 'एसएसआर' महत्त्वाचा आहे. हा अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. विद्यापीठाच्या प्रशासनातील विभाग आणि विविध अधिविभागांकडून आवश्यक ती माहिती घेण्यात येत आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात 'एसएसआर' पाठविण्यात येणार असल्याचे डॉ. कामत यांनी सांगितले.

# विद्यापीठात उद्या सामुदायिक सूर्य नमस्काराचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने रविवारी (दि.२) सकाळी ६.३० ते ८.०० या वेळेत मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलातील क्रिकेट मैदानावर जागतिक सूर्यनमस्कार दिनानिमित्त सामुदायिक सूर्य नमस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.